# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in Website : https://grahak.maharashtra.gov.in/


जा.क्र.राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/3699 दिनांक :- 28/05/2015

वाचा :- १) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम
२) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.
अ) राआ/महा./आस्था/नियुक्ती/अध्यक्ष जि.मं./२०१३/३३९, दि.०४.०२.२०१३
आ) राआ/महा./आस्था/नियुक्ती/अध्यक्ष जि.मं./२०१३/३४१, दि.०४.०२.२०१३
३) श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते, मा.अध्यक्षा, जिल्हा मंच, लातूर यांचा दि.१६.१०.२०१४ चा अर्ज
४) श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर,मा.अध्यक्ष,जिल्हा मंच, परभणी व हिंगोली यांचा दि.१६.१०.२०१४ चा अर्ज

## -: कार्यालयीन आदेश :-

वरील क्र.२ च्या या कार्यालयाच्या कार्यालयीन आदेशांनुसार मा.श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते व मा.श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर यांची अनुक्रमे लातूर व परभणी-हिंगोली जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर पदस्थापना करण्यात आली असून सध्या ते सदरील पदावर कार्यरत आहेत.

वरील क्र.३ व ४ च्या अर्जांन्वये श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते, मा.अध्यक्षा, जिल्हा मंच, लातूर व श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर, मा.अध्यक्ष,जिल्हा मंच, परभणी व हिंगोली यांनी आपसात बदलीने पदस्थापना करण्याबाबत विनंती केलेली आहे.

सबब या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते, मा.अध्यक्षा, जिल्हा मंच, लातूर यांची विनंतीनुसार बदलीने परभणी व हिंगोली जिल्हा मंचाच्या अध्यक्ष पदावर (मा.श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर यांचे जागी) पदस्थापना करण्यात येत आहे. मा.श्रीमती सातपुते पुढील आदेशापर्यंत दरमहा शेवटचा आठवडा हिंगोली जिल्हा मंच व उर्वरित दिवस परभणी जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर काम करतील.

२) श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर, मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, परभणी व हिंगोली यांची विनंतीनुसार बदलीने लातूर जिल्हा मंचाच्या अध्यक्ष पदावर (मा.श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते यांचे जागी) पदस्थापना करण्यात येत आहे.

उक्त मा.श्रीमती सातपुते व मा.श्री.निटूरकर यांची या आदेशान्वये करण्यात येत असलेली बदलीने पदस्थापना त्यांचे विनंतीनुसार करण्यात येत असल्याने त्यांना बदली अनुदान व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

ASW
28/05/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,

१) श्रीमती अनुराधा गोंविदराव सातपुते,
मा.अध्यक्षा, जिल्हा मंच, लातूर

२) श्री.प्रदीप प्रभाकरराव निटूरकर,
मा.अध्यक्ष, जिल्हा मंच, परभणी व हिंगोली

प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव (ई-मेलद्वारा) :-

१) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र
२) मा.पालक सदस्य/सदस्या, जिल्हा मंच, लातूर, परभणी व हिंगोली
३) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा.सदस्य/सदस्या, जिल्हा मंच, लातूर, परभणी व हिंगोली
५) प्रबंधक विधी, राज्य आयोग, महाराष्ट्र, नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
६) प्रबंधक, जिल्हा मंच, लातूर, परभणी व हिंगोली

- *हा आदेश राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्रच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.*